# पार्किन्सन्स डिझीस एन्ड मुवमेन्ट डिस्ऑर्डर सोसायटी

पार्किन्सनच्या रुग्णांचे आणि त्यांची देखभाल करणाऱ्यांचे आयुष्य अधिक सुकर व्हावे हे उद्दिष्ट समोर ठेऊन 'पार्किन्सन्स डिझीस एन्ड मुवमेन्ट डिस्ऑर्डर सोसायटी' (पीडीएमडीएस) ही धर्मादाय संस्था आपले कार्य करते. मुंबई आणि उपनगरांमधे या संस्थेच्या आधारगटांचे जाळे पसरलेले आहे.

## आधारगटाच्या सभांमधे आम्ही काय करतो?

पार्किन्सन्सच्या लक्षणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बहुशाखा पद्धतींचा उपयोग करुन आम्ही कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करतो. या कार्यक्रमांमधे, पार्किन्सन्सच्या आजाराबाबतीतील वैद्यकीय शोध, भौतिचिकित्सा, व्यवसायोपचार, वाक्‌चिकित्सा (स्पीच थेरेपी), आहार आणि पोषण, योग, शैक्षणिक आणि संज्ञानी प्रशिक्षण, कला आणि नृत्यावर आधारित उपचारांचा समावेश आहे.

## आधारगटात का सामील व्हाल?

आधारगटात सामील झाल्यावर एक महत्वाची गोष्ट तुमच्या लक्षात येईल ती म्हणजे ' अशी परिस्थिती असलेले आपण एकटेच नव्हे.' आधारगटाचे सदस्य एकमेकांना भावनात्मक आणि व्यावहारिक आधार देतात. तसेच पार्किनसन्सचा आजार आणि त्याच्या उपचारात येणाऱ्या समस्यांची माहिती आपल्याला मिळते.

घराबाहेर पडू न शकणाऱ्या रुग्णांपर्यंतदेखील पोचता येईल असा खास संपर्क कार्यक्रम आम्ही आखलेला आहे. तसेच गरजू रुग्णांना लागणाऱ्या वैद्यकीय व सहाय्यक वस्तुंकरता आम्ही आर्थिक सहाय्य देतो.

आधारगट आणि भौतिचिकित्सा हस्तक्षेप उपक्रमांच्या यादीकरता कृपया पान २ आणि ३ पहा.

*डॉ. मारिया बरेट्टो*
*समन्वयक – पीडीएमडीएस*

अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर आमच्याशी संपर्क साधाः

**पार्किन्सन्स डिझीस एन्ड मुवमेन्ट डिस्ऑर्डर सोसायटी**
डॉ. बी.एस. सिंघल
खोली क्र. १३१, बॉम्बे हॉस्पिटल
१२, मरीन लाइन्स,
मुंबई ४०० ०२०
**ई मेलः** pdmds.india@gmail.com
**संकेतस्थळः** www.parkinsonssocietyindia.com
**दूरध्वनीः** 022-24977477;  (0) 9987216057